आकाशवाणी नागपूर,

प्रादेशिक वृत्त विभाग

प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)

शुक्रवार दिनांक २२ नोव्हेंबर २०२४

1. उद्या राज्य विधानसभा निवडणुकांच्या मतमोजणीसाठी सर्वत्र स्थानिक यंत्रणा सज्ज.
2. मध्य भारतातील सर्वात मोठ्या 'ॲग्रोव्हिजन' कृषी प्रदर्शनाचं आज पीडीकेव्ही ग्राउंड, दाभा इथं उद्घाटन; 400 हून अधिक कंपन्यांचा सहभाग.
3. राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाची बारावीची लेखी परीक्षा पुढच्या वर्षी ११ फेब्रुवारी, तर दहावीची परीक्षा २१ फेब्रुवारी पासून होणार.
4. विदर्भ गारठला; किमान तापमान १३ अंश सेल्सिअसच्या खाली.

उद्या मतमोजणी

महाराष्ट्रात विधानसभा निवडणुकीची मतमोजणी उद्या सकाळी ८ वाजल्यापासून सुरू होणार आहे. मतमोजणीची सुरुवात टपाली मतांच्या मोजणीपासून होईल आणि त्यानंतर साधारण साडेआठ वाजल्यापासून ईव्हीएमवरच्या मतांची मोजणी सुरू होईल, अशी माहिती राज्याचे मुख्य निवडणूक आयुक्त एस. चोक्कलिंगम यांनी दिली आहे. २८८ विधानसभा मतदारसंघांमधल्या मतमोजणीसाठी तितकीच मोजणी केंद्रं काम करणार आहेत, शिवाय नांदेड लोकसभा मतदारसंघाच्या पोटनिवडणुकीसाठी एक मोजणी केंद्र स्थापन करण्यात आलं आहे. या प्रक्रियेसाठी सुमारे ६ हजार ६०० पथकं नियुक्त करण्यात आली आहेत. मतमोजणी केंद्रांवर केंद्रीय पोलीस दल, राज्य राखीव पोलीस दल आणि स्थानिक पोलिसांच्या कड्यांची त्रिस्तरीय सुरक्षाव्यवस्था तैनात करण्यात आली आहे. मतमोजणीच्या प्रक्रियेवर सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची करडी नजर असणार आहे. दुपारी बाराच्या सुमाराला पहिले निकाल हातात येतील, मात्र मतदारसंघाच्या आकारमानानुसार यात फरक पडू शकतो. संध्याकाळी निकालाचं पूर्ण चित्र स्पष्ट होईल, असंही एस. चोक्कलिंगम यांनी नमूद केलं आहे.

पोलीस आयुक्त बैठक

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय अंतर्गत ८ मतमोजणी केंद्रांवर उद्या २३ नोव्हेंबर रोजी मतमोजणी प्रक्रिया ही शांतता पार पडावी याकरिता नागपूर शहरचे पोलीस आयुक्त डॉ.रवींद्र कुमार सिंगल यांनी आज सिव्हिल लाईन्स स्थित पोलीस भवन इथं बैठक घेतली. मतमोजणी दरम्यान शांतता राखण्यासाठी विविध महत्त्वाच्या बाबींवर यावेळी चर्चा करण्यात आली. पोलीस आयुक्तांनी स्ट्रॉंग रूम्स आणि मतमोजणी केंद्रांचा चोख बंदोबस्त राहावा याकरिता प्रत्येक वरिष्ठ पोलीस निरीक्षकानी केलेल्या आखणी बाबत आढावा घेतला. मतमोजणी प्रक्रियेत अडथळा येऊ नये म्हणून असामाजिक तत्वांवर कडक नजर ठेवण्यात यावी. वाहनं, मेगाफोन, व्हिडिओग्राफी, फोटोग्राफी, तसेच ड्रोनच्या माध्यमातून परिसरावर नजर ठेवण्याबाबत व्यवस्था करावी असे पोलीस आयुक्तांनी बैठकीदरम्यान निर्देश दिले. दरम्यान, नागपूर जिल्ह्यात उद्या सकाळी आठ वाजता मतमोजणीला सुरुवात होऊन जाईल. तर **4:00** वाजेपर्यंत मतदान मोजणीची प्रक्रिया संपेल. नागपूर जिल्ह्यातील बारा मतदारसंघात पूर्ण तयारी झाली आहे, त्याप्रमाणे मतमोजणी एकाच टप्प्यात संपेल असं नियोजन करण्यात आलं आहे. अनेक वर्षांचा रेकॉर्ड मोडत नागपूर जिल्ह्यात सरासरी **61. 06** टक्के मतदान झालं आहे, त्यासाठी जिल्ह्याधिकारी विपिन इटनकर यांनी नागपूरवासीयांचे आभार मानले आहेत.

मतमोजणी तय्यारी (विदर्भ

राज्यात उद्या सर्वत्र मतमोजणी होणार आहे. त्यासाठी सर्व तयारी पूर्ण करण्यात आली असून प्रत्येक विधानसभा मतदार संघासाठी मतमोजणी निरीक्षकाची नियुक्ती करण्यात आली आहे. 38- अमरावती विधानसभा मतदार संघासाठी निवडणुक निरीक्षक (मतमोजणी) सौरभ स्वामी हे असणार आहे. तर 37- बडनेरा विधानसभा मतदार संघासाठी प्रांजल हजारीका या निरीक्षक असतील. याठिकाणी या सर्व मतदानकेंद्रावर ईव्हीएमद्वारे झालेले मतदान मतमोजणीकरीता प्रत्येक फेरीसाठी 14 टेबल, तसेच पोस्टल मतपत्रीकेची मतमोजणी करण्याकरीता 10 आणि ईटीपीबीएमएस करीता 1 याप्रमाणे व्यवस्था करण्यात आली आहे. यवतमाळ जिल्ह्यातील मतदारसंघनिहाय 25 ते 31 फेऱ्या होणार आहेत. याठिकाणी जिल्हा पोलिसांसह आंध्र प्रदेशचे स्पेशल पोलीस पथक आणि एसआरपीएफ चे जवानही बंदोबस्तात आहे. संपूर्ण परिसरात सीसीटीव्हीचाही वॉच ठेवण्यात आला आहे. चंद्रपूर मध्ये मतमोजणीच्या सर्वाधिक 28 फे-या तर बल्लारपूरमध्ये 27 फे-या होणार

आहेत. तर भंडारा जिल्ह्यातील तीनही विधानसभा मतदारसंघात १०० च्या वर अधिकारी कर्मचारी प्रति मतदारसंघ कार्यरत असणार आहे.

रमेश चेन्नीथला

विधानसभा निवडणुकीत महाराष्ट्रातील जनतेचा कौल महाविकास आघाडीलाच मिळेल आणि स्पष्ट बहुमतासह काँग्रेस महाविकास आघाडी सरकार स्थापन करेल असा विश्वास काँग्रेसचे महाराष्ट्र प्रभारी रमेश चेन्नीथला यांनी व्यक्त केला. लोकसभा निवडणुकीप्रमाणे विधानसभा निवडणुकीतही महाराष्ट्रातील जनता काँग्रेस आणि महाविकास आघाडीच्या पाठीशी भक्कमपणे उभी राहिली आहे. विधानसभेला जास्त मतदान झाल्याचा फायदाही काँग्रेस महाविकास आघाडीलाच होईल, असं टिळक भवनमध्ये प्रसार माध्यमांशी बोलताना चेन्नीथला पुढे म्हणाले. मुख्यमंत्रीपदावरून कोणताही वाद नाही. निकालानंतर महाविकास आघाडीतील प्रमुख नेते एकत्र बसून त्यावर निर्णय घेतील असं देखील ते म्हणाले.

नाना पटोले

मतदान दिनीचा फार्म १७ सी भाग दोन, फेरीनिहाय तक्ता (परिशिष्ट-५७) आणि अंतिम निकाल (फार्म-२०) पडताळणीसाठी याची प्रत उमेदवार प्रतिनिधीला त्वरित देण्यात यावी अशा सूचना सर्व निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांना द्याव्यात, अशी मागणी करणारे पत्र महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी राज्याच्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांना पाठविले आहे.

सुधाकर अडबाले

राज्यात विधानसभा निवडणुकीची मतदान प्रक्रिया बुधवारी पार पडली. यासाठी शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी आपली जबाबदारी चोखपणे बजावली. मात्र, निवडणूक कर्तव्यावर असलेल्या राज्यातील अनेक शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना पोस्टल बॅलेट मिळाले नसल्याने त्यांना मतदानापासून वंचित राहावं लागल्याचा आरोप आमदार सुधाकर अडबाले यांनी केला आहे. या प्रकरणाची सखोल चौकशी करून जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई करावी, अशी मागणी अडबाले यांनी राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी आणि मुख्य सचिव यांच्याकडे केली आहे.

अॅग्रोव्हिजन

मध्य भारतातील सर्वात मोठे कृषी प्रदर्शन ‘अॅग्रोव्हिजन’चं आज, पीडीकेव्ही ग्राउंड, दाभा इथं आज उद्घाटन झालं. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ कुलगुरू डॉ. शरद गडाख, एमपीकेव्ही राहुरीचे कुलगुरू डॉ.पी.जी.पाटील, माफसू नागपूरचे कुलगुरू डॉ.नितीन पाटील यांसह शेती व्यवसायातील प्रमुख व्यक्तींची या कार्यक्रमाला उपस्थिती होती. उद्घाटनानंतर मुख्य सभागृहात 12 वाजता ‘विदर्भातील दुग्धव्यवसाय वाढीच्या संधी’ विषयावर महत्वाची परिषद झाली. भारतातील कृषी उत्पादनांची निर्मिती करणाऱ्या अनेक नामवंत कंपन्या, संशोधन संस्था, सरकारी विभाग, विविध राज्ये, कृषी विद्यापीठे, प्रगत कृषी तंत्रज्ञान, संशोधन आणि सेवा क्षेत्रातील आघाडीच्या संस्था यात सहभागी झाल्या आहेत. आयआयटी खरगपूर, एफटीपीआयचे स्टार्टअप्स तसेच, माहिती तंत्रज्ञानाचे स्वतंत्र स्टॉल्स राहणार असून ड्रोनची प्रात्यक्षिके देखील बघायला मिळतील. या प्रदर्शनाची यावर्षीची संकल्पना 'शेतकरी सक्षमीकरणासाठी यंत्र,तंत्र आणि व्यापार वाढीचे मंत्र, अशी आहे. 400 हून अधिक कंपन्यानी आपला सहभाग ऍग्रो व्हिजन मधे निश्चित केला आहे. यावर्षीच्या ऍग्रो व्हिजन मध्ये एकूण ४१ विविध विषयावर कार्यशाळा आयोजित केल्या जातील. या कार्यशाळांमध्ये शेतकऱ्यांना देशभरातील तज्ज्ञांचे मार्गदर्शन आणि यशस्वी शेतकऱ्यांकडून शिकण्याची अनोखी संधी मिळेल. उद्या सकाळी 11 वाजता 'शेतीमध्ये माहिती तंत्रज्ञानाचा उपयोग' या विषयावर विशेष कार्यशाळा होणार आहे. त्याचवेळी मुख्य सभागृहात 'ऊस उत्पादन वाढीसाठी तंत्रज्ञानाचा उपयोग' यावर कार्यशाळा होणार आहे. दुपारी २ वाजता 'युवकांचे शेतीमध्ये योगदान' यावर कार्यशाळा आयोजिण्यात आली आहे.

वेळापत्रक प्रसिद्ध

राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या बारावी आणि दहावीच्या परीक्षेचं अंतिम वेळापत्रक प्रसिद्ध करण्यात आलं आहे. त्यानुसार बारावीची लेखी परीक्षा पुढच्या वर्षी ११ फेब्रुवारी ते १८ मार्च, तर दहावीची परीक्षा २१ फेब्रुवारी ते १७ मार्च या काळात घेतली जाणार आहे. तत्पूर्वी बारावीची प्रात्यक्षिक, अंतर्गत मूल्यमापन, तोंडी परीक्षा २४ जानेवारी ते १० फेब्रुवारी या काळात घेतली जाईल, तर दहावीची प्रात्यक्षिक, अंतर्गत मूल्यमापन, तोंडी परीक्षा तीन ते २० फेब्रुवारी या कालावधीत होणार आहे. केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळ-सीबीएसईच्या दहावी आणि बारावीच्या परीक्षा १५ फेब्रुवारी पासून सुरु होणार आहेत. दहावीच्या परीक्षा १८

मार्चपर्यंत तर बारावीच्या परीक्षा ४ एप्रिलपर्यंत चालणार आहेत. सीबीएसईनं यावर्षी पहिल्यांदाच परीक्षेच्या ८६ दिवस आधीच वेळापत्रक जाहीर केलं आहे.

इफी

गोवा आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाच्या फिल्म बाजार मध्ये महाराष्ट्र फिल्मसिटी मुंबईचा स्टॉल उभारण्यात आला असून हा स्टॉल आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरत आहे. देश विदेशातील कलाकार,दिग्दर्शक, निर्माते तसेच अधिकारी या स्टॉलला भेट देऊन कौतुक करत आहेत. या स्टॉलमध्ये महाराष्ट्र शासनातर्फे फिल्म बाजारात आलेल्या चार चित्रपटांची माहिती, चित्रपटांच्या लोकेशन करिता लागणाऱ्या परवानगी देणारी फिल्म सेल प्रणाली,कलाकारांचे हक्काचे व्यासपीठ कलासेतू पोर्टल आदी गोष्टींचा प्रचार व्यापक स्वरूपात करण्यात येत आहे. हा स्टॉल तंत्रस्नेही बनवण्याचा प्रयत्न करण्यात आला असून सर्व प्रकारची माहिती क्यूआर कोडने देखील मिळवता येते. अभिनेत्री सोनाली कुलकर्णी, दिग्दर्शक आशुतोष गोवारीकर, अनंत महादेवन, निखिल महाजन यांच्या सह विविध कलाकारांनी या स्टॉल ला भेट दिली आहे.शिवाय केंद्रीय सचिव संजय जाजु यांनी देखील स्टॉलला भेट देऊन कौतुक केलं. छबीला, आत्मपॅाँपलेट, तेरव, विषयहार्ड या चार चित्रपटांच्या प्रत्येकी दोन प्रतिनिधीसह सह व्यवस्थापकीय संचालक डॉ. धनंजय सावळकर, मुख्य प्रशासकीय अधिकारी गीता देशपांडे आणि काही अधिकारी कर्मचारी यांचे शिष्टमंडळ यावेळी उपस्थित होते.

कसोटी क्रिकेट

भारत आणि ऑस्ट्रेलिया बॉर्डर- गावसकर चषक क्रिकेट कसोटी मालिकेतल्या पहिल्या सामन्यात भारताचा पहिला डाव अवघ्या १५० धावांवर समाप्त झाला. ऑस्ट्रेलियात पर्थ इथल्या ऑप्टस मैदानावर सामन्याला आज सकाळी सुरुवात झाली. भारतानं नाणेफेक जिंकत प्रथम फलंदाजीचा निर्णय घेतला. मात्र भारतीय फलंदाजांनी सपशेल निराशा केल्यानं भारताचा डाव १५० धावांत आटोपला. के एल राहुल, ध्रुव जुरेल, ऋषभ पंत, नितीश कुमार रेड्डी यांचा अपवाद वगळता एकही फलंदाज मैदानावर फार काळ टिकू शकला नाही. ऑस्ट्रेलियाचा डाव सुरू झाला असून दिवसा अखेर त्यांच्या ७ बाद ६७ धावा झाल्या आहेत.

हवामान

मागील **24** तासात विदर्भात गोंदिया जिल्ह्यात सर्वात कमी **12.8** अंश सेल्सियस इतक्या किमान तापमानाची नोंद करण्यात आली आहे. गडचिरोली इथं १३ अंश सेल्सिय तापमान नोंदविण्यात आलं. तर नागपूर, वर्धा, बुलढाणा या जिल्ह्यांमध्ये किमान तापमान **15** ते **16** अंश सेल्सिअसच्या दरम्यान होतं. अकोला इथं **30** पूर्णांक सात दशांश अंश सेल्सिअस इतक्या कमाल तापमानाची नोंद करण्यात आली.

******